

DATE 22/07/2018

## सागर किनारा

दृष्टी शोधिते पैलतीर या अथांग सागर किनारी ।
न दिसे परि अंत तयाचा, गूढ हे मम अंतरी ॥
सुवर्णरंगी वस्त्र लेवूनी, गर्जत या लाटा निघाल्या ।
प्रेम भराने, अति आवेगाने भेटण्या किनाऱ्याला ॥
परि मध्येच विरती, शांत होती, जलात मिसळूनी जाती ।
हुरहूर लावी अधुरे मीलन, अधुरी त्यांची प्रीती ॥
तटस्थतेने बघे किनारा, उद्दीपीत नर्तन लाटांचे ।
ध्यानमग्न जणू हा योगी भासतो, ना महत्व भावनांचे ॥
आवरून आपुला तेजाचा पसारा, सूर्य झुकतो खाली ।
मायेने कुणी, विश्रांतीस्तव तया साद घाली ॥
मावळतीच्या गौर वर्ण हा पहा, लाल सांवळा झाला ।
रंग बदलती, क्षितीजा वरती, कसे क्षणा क्षणाला ॥
क्षणभर स्थिरावला दिव्य गोल तो, पश्चिमेच्या कडेला ।
निमिषार्धातच तो ज्ञानगभस्ती अस्ताला गेला ॥
हळूच येतो, पसरू लागतो काळोख आपुले मायाजाल ।
भयचकीत होऊनी, थरथरली धरणी, पांघरे अंधाराची शाल ॥
परि आठवती, कानी घुमती, अनुरक्त सूर्याचे ते वचन ।
सोडविन तुज, या तमातुनी उष:काली येऊन ॥
या धरणीचे, या सूर्याचे, अन गूढ गहन विणले हे नाते ।
तसाच तो सागर किनारा, त्या लाटा, हे चक्र प्रीतीचे फिरते ॥